**<u>ठळक बातम्या</u>**

- बलिप्रतिपदा, पाडवा पहाट कार्यक्रमांमुळं राज्यभरात दिवाळी जोरात
- खाद्यतेल उत्पादक आणि संबंधितांना केंद्र सरकारकडे साठ्याची नोंदणी करण्याचं बंधन
- मुंबईतल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून उच्चस्तरीय समितीची स्थापना

**आणि**

- ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं निधन

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या सणाच्या दिवशी नवीन खरेदी किंवा उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. विक्रम संवत २०८२ पिंगलनाम संवत्सराचा प्रारंभही आज झाला. पती-पत्नीच्या नात्याचा सण मानल्या जाणाऱ्या पाडव्यानिमित्त घरोघरी सजावट, फराळ आणि खरेदीची लगबग दिसत आहे. अनेक ठिकाणी पाडवा पहाट कार्यक्रमांचं आयोजन झाल्यानं अनेक जण उत्साहात त्यात सहभागी झाले होते. नवीन वाहनं, कपडे, भेटवस्तू, मिठाई खरेदी करण्यासाठीही बाजारात गर्दी दिसत होती.

व्यापारी वर्गानं आजच्या दिवशी नववर्षाची सुरुवात करून नवीन वह्यांचं पूजन केलं. काही भागांत बळी पूजन, तर उत्तरेत गोवर्धन पूजेचा आणि अन्नकूट परंपरेचा सोहळा मोठ्या श्रद्धेने साजरा होतो.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सर्व खाद्यतेल उत्पादक, प्रक्रिया करणारे, मिश्रण करणारे, पुन्हा पॅकिंग करणारे आणि या संपूर्ण पुरवठा साखळीत सहभागी असलेल्या प्रत्येक संबंधिताला नोंदणी करणं बंधनकारक केलं गेलं आहे.

यासोबतच या सर्व भागधारकांना उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर दर महिन्याला, त्यांच्याकडच्या उत्पादनांची आणि साठ्याची माहिती देणंही अनिवार्य केलं गेलं आहे. यामुळे खाद्यतेल क्षेत्राशी संबंधीत अचूक आकडेवारी संकलित करणं, साठ्यावर देखरेख ठेवणं आणि याआधारे धोरणांची आखणी करताना मदत होणार असल्याचं विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील, आदिवासी पाड्यांवर दरवर्षी प्रमाणे यंदाही आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. मागील २६ वर्षांपासून ते आपल्या घरी दिवाळी साजरी न करता, भिंगारा, गोमाल, चाळीसटपरी, उमापूर अशा दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींमध्ये जाऊन, कपडे आणि मिठाई वाटप करतात.

**<><><><><>**

ऐन दिवाळीत बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री घरकुल आवास योजने अंतर्गत ५० हजार घरकुले राज्य सरकारच्या वतीने विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली. त्यामुळं बीड वासियांची दिवाळी नवीन घरकुलात साजरी होणार आहे. या योजनेसाठी शासनाकडून ९९० कोटीं रूपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाभार्थ्यांचे आणि जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

दिवाळी निमित्त बुलडाणा जिल्ह्यातल्या चिखलीमधले रविंद्र इंगळे यांनी दिवे, पणत्यांची विक्री सुरू केली आहे. या पणत्या, दिवे त्यांनी स्वतः तयार केल्या आहेत. ९० टक्के दिव्यांग असताना त्यांनी केलेल्या वस्तूंना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे आणि हा व्यवसाय करताना सामाजिक भान पण ते जपत आहेत.

**होल्ड रविंद्र इंगळे बाइट**

**<><><><><>**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या लातूर जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन तर्फे हरभरा आणि ज्वारीच्या बियाण्यांच्या दोन हजार बॅगांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला फांउडेशनचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या निकषांमुळे कापसाला योग्य भाव मिळत नसल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. एकीकडे राज्यातला कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आहे, तर दुसरीकडे सत्ताधारी आमदारांना पाच कोटी रुपयांचा निधी दिला गेला आहे असं म्हणत, सरकारकडे शेतकऱ्यांसाठी पैसे नाहीत का असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. राज्यातल्या आदिवासी आणि मागासवर्गीय विभागांचा निधी वळवला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मनसेच्या महाविकास आघाडीतल्या समावेशाबद्दल वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल असं त्यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या बोरीवली इथल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचं संरक्षण आणि संवर्धनासाठी मुंबई उच्च न्यायालयाने एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. राष्ट्रीय उद्यानाची हद्द निश्चित करणं, अतिक्रमण रोखणं, यापूर्वी झालेल्या अतिक्रमणांना हटवून त्यांचं पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना करणं, अतिक्रमणं हटवण्यासाठी प्रलंबित अर्जांबाबत अहवाल सादर करणं या जबाबदाऱ्या समितीवर सोपवण्यात आल्या आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले या समितीचे अध्यक्ष असून राज्याचे माजी मुख्य सचिव नितीन करीर, माजी पोलीस महासंचालक सुबोधकुमार जयस्वाल, वनसंरक्षक आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालक अनिता पाटील यांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. इस्रोच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. डॉ. होमी भाभा यांच्यासह भारतीय अवकाश कार्यक्रमाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. देशातला इन्सॅट हा पहिला दूरसंचार उपग्रह बनवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. श्रीहरीकोटा आणि थुंबा इथल्या प्रक्षेपण केंद्राची जागा निवडण्यात त्यांनी पुढाकार घेतला. १९७० च्या दशकापासून त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे १९९० च्या दशकात देशात खेडोपाडी टीव्ही पोचले. उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी नागपूरच्या आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. अमरावतीमधल्या भारतीय जनसंचार

संस्थेची बडनेरा इथली इमारत २ वर्षात पूर्ण करावी असे निर्देश त्यांनी दिले. बडनेरा इथल्या प्रस्तावित जागेची त्यांनी पाहणी केली आणि २०२७ चे शैक्षणिक सत्र इथेच सुरू होईल, या दिशेने कामं गतीमान करण्याचे आदेश दिले.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागानं गेल्या २ दिवसात केलेल्या कारवाईत अंमली पदार्थांचा २० कोटी रुपयांचा साठा जप्त केला. हाँगकाँग आणि बँकॉकहून हे प्रवाशी आले होते. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

**<><><><><>**

फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या भारतात प्रत्यार्पणाविरोधातली याचिका अँटवर्प इथल्या अपील न्यायालयानं आज फेटाळली. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी तो मुख्य आरोपी आहे. त्याचं नागरिकत्व हा त्याच्या भारतात प्रत्यार्पणात अडथळा नाही, असा निर्वाळा न्यायालयानं दिला. मेहुल चोकसीची याचिका न्यायालयानं फेटाळल्यानंतर आता त्याच्यासमोर बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तो जर अयशस्वी झाला, तर बेल्जियम सरकार त्याचं भारताकडे प्रत्यार्पण करेल. भारतात आल्यानंतर गुन्हेगारी कट, फसवणूक आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांचा सामना त्याला करावा लागेल.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, उद्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर दुपारी ३ वाजता हा सामना सुरु होईल.

गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे.

दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे.

**<><><><><>**

मराठवाडा आणि विदर्भाचा काही भाग वगळता राज्याच्या बहुतांश भागासाठी हवामान विभागानं आज आणि उद्यासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात राज्यात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे. तर काही ठिकाणी विजांचा कडकडाट तसंच सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता देखील वर्तवली आहे.

**//<><><><><>//**